महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
३, महापालिकामार्ग, पत्रपेटीक्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : ०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/१० 
दिनांक : १७/ ०१ / २०२२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या "स्वनाथ शिष्यवृत्ती योजना" अंमलबजावणीबाबत ....**

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/४२७ दि.१३/१०/२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/४४३ दि.२८/१०/२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२१-२२/४४७ दि.०३/११/२०२१
४. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४५१ दि.०९/११/२०२१--VC
५. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४७८ दि.०१/१२/२०२१
६. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४८८ दि.२०/१२/२०२१
७. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/४९५ दि.२४/१२/२०२१
८. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/एनएसपी-शिष्य/विकाप/२०२१-२२/०४ दि.०५/०१/२०२२
९. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांचेकडून दि.१६/१२/२०२१ च्या ईमेलने प्राप्त संदेश.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद्रेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका,पदवी ) शिकणाऱ्या **अनाथ किंवा ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत** अशा विद्यार्थ्यांसाठी **स्वनाथ शिष्यवृत्ती** योजना सन २०२१-२२ पासून सुरू केलेली आहे. सदर योजनेच्या महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

**"स्वनाथ शिष्यवृत्ती योजना"** या योजनेच्या मार्गदर्शक तत्वे / FAQ नुसार **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** अशा विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - कोविड-१९ मुळे मृत्यू असे नमूद असणे आवश्यक आहे.

तरी याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना असे कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना, **ज्या विद्यार्थ्यांच्या आई वडीलांचा किंवा दोघांपैकी एकाचा कोविड-१९ मुळे मृत्यू झाला आहे** व योजनेचा लाभासाठी अर्ज करु इच्छितात अशा विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सूचित करण्याबाबत कळविण्यात यावे.

१. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण - **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे कारण नमूद असलेले मृत्यू प्रमाणपत्र अर्जासोबत Upload करावे. **किंवा**

२. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे मृत्यू प्रमाणपत्रावर मृत्यूचे कारण **कोविड-१९ मुळे मृत्यू** असे नमूद नसेल तर त्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर अर्ज करतेवेळी, मृत्यू प्रमाणपत्रासोबत **कोविड-१९ मुळे मृत्यू** नमूद असलेली रुग्णालयाची Discharge Slip / **Form No.4 / Form No. 4A** अपलोड करावे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत - मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

दिनांक :- पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/NSP/शिष्य./२०२१-२२/ २१९

20 JAN 2022

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, NSP पोर्टलव्दारे शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्याचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून सदर योजनांतर्गत आपल्या संस्थेतील प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याकरिता पत्रात दिलेल्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर